पिंकस आणि शेल्डन

पॅट्रिशिया पोलको

अनुवाद : सुजाता गोडबोले



पिंकस आयलीच्या स्मृतीस समर्पित

पिंकस आणि शेल्डन

पॅट्रिशिया पोलको

अनुवाद : सुजाता गोडबोले







शेल्डन रसेल कर्टीसने ही गोष्ट आपल्या रोझा नावाच्या मुलीला सांगितली, तेव्हा तिने त्यातील प्रत्येक शब्द आपल्या हृदयात जपून ठेवला आणि आपल्या आयुष्यात तिने ही गोष्ट अनेक वेळा अनेकांना सांगितली.

एका मोठ्या रणधुमाळीत शेल्डन जखमी झाला होता आणि तो मरण पावला आहे असे समजून रक्ताने माखलेल्या जॉर्जियातील एका माळरानात त्याला सोडून देण्यात आले होते. त्यावेळी तो केवळ पंधरा वर्षांचा होता. त्याला आठवते त्याप्रमाणे, दोन दिवस तो तिथे तसाच पडून राहिला होता आणि तापाने फणफणला होता. अधून मधून त्याची शुद्धही हरपत होती. दुसऱ्या एका त्याच्यासारख्याच, आपल्या तुकडीतून मागे पडलेल्या, एका मुलाने त्याला या माळरानातून वाचवले होते.

शक्य तितक्या त्याच्याच शब्दांत मी ही त्याची गोष्ट सांगण्याचा प्रयत्न करणार आहे.



सूर्य हळू हळू आकाशाच्या मध्यावर येत असलेला मला दिसत होता. मी खूपच जखमी झालो होतो. जवळ जवळ वर्षभर मी या युद्धात लढत होतो. हे राज्यांमधील युद्ध होते. मी तर लहान मुलगाच होतो आणि केव्हा एकदा घरी जातो याची वाट पाहत होतो.

माझ्या पायाची आग होत होती आणि माझ्या गुडघ्याच्या वरच्या बाजूला एक बंदुकीची गोळी घुसून बसली होती तिथे अतिशय दुखत होते. मधूनच मला झोप लागायची आणि सगळेच दिसेनासे व्हायचे. मग परत केव्हातरी मला जाग यायची. मला ओहायो राज्यातील आमच्या शेतावर परत जायचे होते. काही वेळा मला अशा अर्धवट बेशुद्ध अवस्थेत भास व्हायचे की मी आईबरोबर आहे आणि तिने केलेली ताजी बिस्किटे ओव्हनमधून काढून ती मला देते आहे.

मग मला एक आवाज ऐकू आला. क्षणभर मला वाटलं की मला तापामुळे भास होत असावा. पण माझ्या कपाळावर कोणीतरी हात ठेवला होता आणि माझ्या चेहऱ्यावर पाणी शिंपडले जात असल्याचे मला जाणवले.



“अरे, तू इथे पडला आहेस म्हणजे तू मेलेला असणार,” आपल्याजवळचे पाणी मला पाजता पाजता तो आवाज म्हणाला. “तुला कुठे गोळी लागली आहे? कारण गोळी जर तुझ्या पोटात लागली असेल, तर तुला इथेच सोडून मला जावं लागेल.”

त्याच्यासारखा दिसणारा माणूस मी कधीच इतक्या जवळून पहिला नव्हता. त्याचा रंग पॉलिश केलेल्या महोगनी लाकडासारखा होता. माझ्यासारखाच त्याच्याकडेही संघराज्याचा झेंडा होता. कदाचित वयानेही माझ्या एवढाच असेल. त्याचा आवाज ऐकून बरे वाटत होते आणि तो मला चांगली मदत करत होता.

“गोळी माझ्या पायाला लागली आहे,” मी त्याला सांगितले. “तिथे जर हिरवे-निळे झाले नसेल, तर ठीक आहे असेच म्हणूया .”


“तुला पायावर वजन देता येते का?” मला माझ्या पायावर उभे करताना त्याने विचारले. “आपल्याला इथून निघायला हवे. आपण जर एका ठिकाणी थांबलो तर आपण लुटारूंना सापडू. ते घोड्यावरून येतात आणि जखमी लोकांच्या शोधातच असतात.”

."



त्यानंतर मला एकच गोष्ट आठवते आणि ती म्हणजे मी जमिनीवर कोसळलो आणि पायाच्या जखमेच्या दुखण्याने थरथरू लागलो. मग सर्वच धूसर होऊ लागले. त्यानंतर त्याने मला त्याच्या पाठीवर उचलून घेतलेले मला आठवते. मग तो म्हणाला, “परमेश्वरा, या मुलावर दया कर. तुलाही माझ्यासारखंच लागलं आहे. मी तुला पाठुंगळी घेऊन जाईन. तुला इथे कसा सोडून जाऊ?”

मला ओढून, उचलून घेऊन तो अडखळत जात होता हे मला आठवते. झाडांच्या फांद्या माझ्या तोंडावर आपटून तुटत होत्या आणि कोणाला दिसू नये म्हणून आम्ही जमिनीलगत वाकून जाताना माझ्या तोंडात माती जात होती. आम्ही मोठ्या कष्टाने लहान सहान झुडपांचा आधार घेऊन काही झरे पार केले, कोरड्या जमिनीवरून रांगत गेलो, हे सर्व मला आठवते. या सर्व गोष्टी मला अर्धवट झोपेत असल्यासारख्या आठवतात. पण बराच मोठा प्रवास त्याने मला उचलून केला हे मात्र मला चांगले आठवते.





मला परत ताप चढला असणार, कारण मला माझ्या चेहऱ्याजवळ एक छान वासाची गार गार गोधडी जाणवू लागली. कोमल, मुलायम, हात माझ्या डोक्यावर ओल्या कापडाच्या घड्या ठेवत होते.

“बघ आता सकाळ होते आहे,” मला ओटची खीर भरवताना एका बाईंचा आवाज आला. “आपला मुलगा किती सुरेख आहे हे तुझ्या आईला माहित आहे का?”

“मी कुठे आहे? हा स्वर्ग आहे का?” मी विचारले.

तिने मान हलवली आणि ती हसू लागली. “नाही बाळा! पिंकस तुला घरी माझ्याकडे घेऊन आला- तुला आठवत नाही का?”

पिंकस म्हणजे तो महोगनीच्या रंगाचा मुलगा असणार, मी विचार केला.

तुम्ही दोघेही किती तरी दिवस भटकत होतात, परमेश्वराचीच कृपा म्हणून त्याने तुम्हाला दोघांनाही इथे आणले. हा एक चमत्कारच आहे.


त्यावेळी माझ्या मनात विचार आला की ही लढाई या मुलाच्या घराजवळच चालली होती की काय? पण त्याच्या घराच्या मागच्या अंगणात लढाई चालली असेल अशी मला कल्पनाच करता येईना. मी पलीकडे वळून पाहिले तर तो खिडकीतून बाहेर पाहत होता.

“तुला फारसं काही आठवत नाही असं दिसतंय,” तो म्हणाला, “माझं नाव पिंकस आयली, मी ४८ व्या तुकडीमध्ये लढत होतो. माझ्या तुकडीशी माझी चुकामूक झाल्यावर तू मला सापडलास.”

“माझं नाव शेल्डन. शेल्डन कर्टिस,” मी हलक्या आवाजात म्हणालो.

“ही माझी आई, मो मो बे,” तो म्हणाला आणि ती माझ्याकडे पाहून गोड हसली.







“परमेश्वरा, हा माझा लाडका मुलगा मला परत भेटेल असं मला वाटलंच नव्हतं,” त्याला कवेत घेत ती म्हणाली, “तसं माझं बरं चाललं होतं, पिंकस. जेव्हा आम्ही घर सोडलं, तेव्हा गरम कपडे घरातच राहिले, इतर सामानही राहिलं. बाकीचं मला रानातून मिळतं. जवळच एक गोड्या पाण्याचा झरा देखील आहे. माझ्याकडे अद्याप काही कोंबड्या आहेत आणि एक गायही आहे, ती अजून दूध देते आहे.”

“पण म्हणजे तू इथे एकटीच आहेस?” पिंकसने त्याच्या आईला विचारले. “बाकीचे सगळे कुठे गेले?”


“लढाईत भाग घ्यायला तुझे बाबा महिन्यापूर्वीच निघून गेले. संकटात सापडू नये म्हणून काम करणारे सगळे आणि त्यांची मुले पळूनच गेले. पण मी मात्र राहिले. मी रोज देवाची प्रार्थना करत होते. आता देवाने माझी प्रार्थना ऐकलेली दिसते कारण त्याने माझ्या बाळाला इथे परत आणले आहे,” असे म्हणताना तिचा चेहरा आनंदाने फुलला होता. “आता तू आपल्या आईला सोडून कधी जाणार नाहीस ना, बाळ?” ती हळूच म्हणाली.

पिंकस अस्वस्थ दिसत होता पण तो काहीच बोलला नाही.

“आता मी झऱ्यावर जाते आणि हे कपडे चांगले धोपटून धुऊन आणते,” जाण्याची तयारी करता करता ती म्हणाली. “लुटारूंचा आवाज आला, तर तळघरात जाऊन बसा आणि ते जाईपर्यंत बाहेर येऊ नका. मी नेहमी तेच करते.”

“इथे लुटारू येतात?” पिंकसने आश्चर्याने विचारले.

“त्यांनी पाहिलं आहे की इथे त्यांच्यासाठी काहीच नाही आहे...”



आई बाहेर गेल्याबरोबर पिंकस माझ्याशेजारी येऊन बसला.

“शेल्डन बेटा,” तो हळूच म्हणाला, “तू जरा बरा झालास की आपल्याला लगेच इथून निघून जायला हवं. आपण मो मो बे ला मोठा धोका घ्यायला लावतो आहोत. त्यांना जर समजले की तिने सैनिकांना आसरा दिला आहे ...” त्याने ते वाक्य अर्ध्यावरच सोडले. “आपला गणवेश सापडला, तर आपण तो घालायला हवा.”

“म्हणजे परत लढाईवर जायचं?” मी विचारले.

“आता तेवढा एकच मार्ग आहे, नाही का?” असे तो म्हणाला तेव्हा माझा चेहरा पांढरा फटक पडला असणार. त्याने माझ्याकडे पहिले आणि तो म्हणाला, “शेल्डन, तू बरा आहेस ना? तू काळजीत दिसतोस,” असं म्हणत त्याने मला सरळ बसवले.

“तू मला से म्हटलंस तरी चालेल. माझ्या घरातले सगळे मला से म्हणतात, शेल्डन नाही,” मी म्हणालो. “आता तर तूच माझं कुटुंब आहेस.”

“चालेल, से, शेल्डन सारखंच आहे.” असं म्हणत त्याने माझ्या पायावरचं पांघरूण सारखं केलं. “तू पण मला पिंक म्हणत जा.” तो म्हणाला आणि हळूच हसला.





पुढचा सबंध आठवडा मो मो बे ने आम्हाला चांगलं-चुंगलं खाऊ घातलं. दूध आणि मक्याचा ब्रेड मला आयुष्यात कधीच इतका चविष्ट वाटला नव्हता. अनेक महिन्यांनी आता माझ्या पोटात कावळे ओरडत नव्हते. ती मला रोज थोडं थोडं चालायला लावत होती. “म्हणजे तुझा जखमी पाय आखडणार नाही आणि तू लंगडा होणार नाहीस.” असे ती म्हणत असे.


ही जागा काही आमच्या ओहायोमधील शेतापेक्षा फार वेगळी नव्हती, कदाचित थोडी अधिक गरीब असेल, पण दोन्हीकडचा वास सारखाच होता. पाईनच्या झाडांचा वास आणि स्वयंपाकाचा तोच खमंग दरवळ. खारवलेल्या पोर्क बरोबर उकडलेले कडधान्य, मक्याचा ब्रेड, कच्च्या भाज्यांचे सॅलड आणि कांदे. आम्ही झोपलो की ती आमच्याजवळ येऊन बसायची, शेकोटी सारखी करायची आणि आमच्यावर लक्ष ठेवायची. गाढ झोपण्याइतकं कधी सुरक्षित वाटेल असं मला वाटलंच नव्हतं.

“माझ्या आईनं आणि कायलो, म्हणजे माझ्या वडिलांनी, याच ठिकाणी माप ओलांडलं,” मी जेव्हा पहिल्याने घराबाहेर पडलो, तेव्हा पिंक म्हणाला. “आणि पलीकडे दिसते आहे ते त्यांच्या मालकाचं घर होतं. मालक म्हणजे आयली.” मला चालायला मदत करता करता पिंक शांतपणे म्हणाला.

“तुझं आणि त्यांचं आडनाव एकच कसं काय?” मी विचारले.

“अरे, तुम्ही जेव्हा गुलाम असता तेव्हा तुम्हाला स्वतःचं आडनाव नसतं. कायलोला सुद्धा तेच आडनाव घ्यावं लागलं.”







आम्ही एका झाडाखाली बसलो असताना पिंकने मला माझ्या घरी कोण कोण असतं असं विचारलं.

“माझ्या वडिलांना मदत करायला एक भाऊ अजून घरी असतो.” मी उत्तर दिलं.

“तुझ्या तुकडीचं नाव काय होतं?” पिंकने विचारले. खरे तर हे त्याने आधी पण विचारले होते.

“ओहायो २४. माझ्याकडे लाठी होती. मला बंदूक घ्यायची परवानगी नव्हती, पण इतके जण मेले, इतक्या जणांना कुत्र्यासारखं मारून टाकलं की आमच्यासारख्या मुलांना देखील मग बंदुका घ्याव्या लागल्या.”

“निदान तुम्हाला बंदुका मिळाल्या तरी. आमच्या ४८व्या तुकडीत सुरुवातीला बंदुकाच नव्हत्या. आम्ही लाठ्या-काठ्या, हातोड्या घेऊनच लढत होतो. कल्पना कर, आम्ही ज्यांच्यासाठी लढत होतो, त्यांचा आमच्यावर विश्वासच नव्हता.”

अशी कल्पना करणेही माझ्यासाठी कठीण होते.

“अखेर शेवटी जेव्हा त्यांनी आम्हाला जुन्या चापाच्या बंदुकी दिल्या, त्या मेक्सिको आणि अमेरिकेच्या युद्धाच्या वेळच्या होत्या. त्या नेहमी जाम व्हायच्या आणि वाटेल तेव्हा उडायच्या!”

“आणि तरीही तुला परत जावं असं कसं वाटतं ?” मी विचारलं.

“कारण ही माझी लढाई आहे. तशीच ती तुझीही नाही का, से? जर आपण लढलो नाही, तर मग कोण लढेल?”

माझ्याकडे त्याच्या प्रश्नाचं उत्तर नव्हतं, पण देवाशपथ सांगतो, मला परत लढाईवर मुळीच जायचं नव्हतं.





आणखी काही दिवसांनी मला थोडे नीट चालता येऊ लागले, पण तरीही मला मदत लागत होती. एक दिवस पिंक मला मोठ्या घराकडे घेऊन गेला आणि मला ते आतून दाखवले. खरे तर तिथे फारसे काहीच राहिले नव्हते. बहुतेक सर्व जळून गेले होते.

“इथे आयली साहेबांचे मोठे वाचनालय होते आणि त्यात खूप पुस्तके होती,” तो म्हणाला. “कायद्याच्या विरुद्ध असले तरीही त्यांनी मला वाचायला शिकवले.”

“म्हणजे ते चांगले असणार.” मी म्हणालो.

“नाही से, ते चांगल्यापेक्षा वाईट अधिक होते. कधीकधी मला वाटते की त्यांना वाचून दाखवलेले आवडत असावे. त्यांच्याकडे कवितांचे एक खूप जाडजूड पुस्तक होते. रोज रात्री मी त्यांना त्यातून मोठ्याने वाचून दाखवत असे.

“इतकी सुंदर पुस्तके होती म्हणून मी या घराला दुवा देत असे पण... ते ज्याचे प्रतीक होते त्यासाठी मी त्याला शिव्याही देत असे.”

आम्ही आणखी थोडे पुढे गेलो.

“से, गुलाम म्हणून जन्माला येणे फारच त्रासदायक असते. पण आयली साहेबांनी मला वाचायला शिकवल्यावर, जरी त्यांचा माझ्यावर हक्क असला, तरी मी कधीच कोणाच्या ताब्यात जाणार नाही हे मला समजले होते.”

“पिंक, तुझं अंग गरम लागतंय,” मी म्हणालो. “अरे देवा, मला वाटतं तू ही माझ्यासारखाच आजारी आहेस. चल, मी तुला घरी नेतो.”

“अरे, मी ठीक आहे. जरा दमलो आहे इतकंच. पण मी लवकरच लढायला तयार होईन. मी लढणार आहे.”





त्या रात्री जेवण झाल्यावर मो मो बे एक जुने बायबल घेऊन टेबलापाशी आली. ती खूप आनंदात होती. आता लवकरच आम्ही तिथून निघणार आहोत हे तिला सांगण्याचा मला काही धीर होत नव्हता.

"कागद कसा बोलतो हे आयली साहेबांनी त्याला शिकवले आहे. पिंक, त्याला दाखव ना," ती म्हणाली.

पिंकने आपल्या खिशातून एक चष्मा काढला आणि बायबल मधील डेव्हिडच्या प्रार्थनेचे पान उघडले आणि वाचायला सुरुवात केली. त्याचा आवाज स्थिर होता आणि तो फार छान वाचत होता. त्याच्या तोंडचे ते शब्द ऐकून माझ्या डोळ्यांसमोर खरोखरच चित्र उभे राहिले.

"मलाही वाचता येत असते, तर किती बरे झाले असते," मी काही विचार न करताच बोलून गेलो.

मला लाज वाटते आहे हे जेव्हा पिंकच्या लक्षात आले, तेव्हा त्याने माझा हात हातात घेतला.

"मी तुला शिकवेन, से, एक दिवस मी नक्की तुला शिकवेन."

माझा चेहरा लाल होत असल्याचे माझ्या लक्षात आले. मग मी म्हणालो, "मी पण काहीतरी महत्त्वाची गोष्ट केली आहे."

"होय बाळ, तू नक्कीच काहीतरी महत्त्वाचे केले आहेस," त्याची आई म्हणाली.

"मी लिंकनच्या हाताला स्पर्श केला आहे. वॉशिंग्टनच्या जवळ असताना हे घडले. 'बुल रन'च्या अगोदर आम्हाला तिथे ठेवले होते. राष्ट्राध्यक्ष स्वतः सर्वांशी हस्तांदोलन करत होते. आणि मी माझा हात सरळ पुढे केला."

"आणि त्यांनी तो हातात घेतला?" पिंकने विचारले.

"होय! आणि त्यांनी तो हातात घेतला!" मी उत्तर दिले.

"हा एक शकुनच आहे, नाही का?" तो आनंदाने हसत म्हणाला.

"पिंक, माझ्या हाताला हात लाव. म्हणजे आता तुला म्हणता येईल की अब्राहम लिंकनशी हस्तांदोलन केलेला हात मी हातात घेतला आहे!"

"प्रत्यक्ष हात हातात घेण्यासारखीच गोष्ट की!" मो मो बे नवलाने म्हणाली.



दुसऱ्या दिवशी पिंक जवळ जवळ दिवसभर एक जुना नकाशा पाहत बसला होता.

“हे लुटारू त्यांच्या छावणीपासून ३० मैलांपेक्षा अधिक दूरवर जात नाहीत. ते जर इथे येत असले, तर त्यांची छावणी इथून जवळच असणार. आपल्याला नदीच्या दक्षिणेकडे जावे लागेल, पाहिलंस का से? माझी तुकडी तिकडेच जाणार होती. मला वाटतं साधारणपणे इथे आपण त्यांना गाठू शकू.”

“कोणाला गाठणार आहेस? तू जाणार नाहीस ना?” आमच्याकडे येत असलेल्या त्याच्या आईने आमचे बोलणे ऐकले होते.

“हे बघ आई, आम्हाला इथे राहता येणार नाही हे तुला माहीतच होतं. तुला माहित असणारच!” तिला शांत करण्याच्या प्रयत्नात तो म्हणाला.


“नाही, नाही, माझी लाडकी बाळं ती!” आणि ती रडायलाच लागली. बराच वेळ ती रडत राहिली, मग ती स्तब्ध राहून नुसती ऐकू लागली.

“आई, ही लढाई जिंकायलाच हवी, नाही तर या देशाला हा जो आजार जडला आहे, तो कधीच नाहीसा होणार नाही.” केव्हाही बोलताना पिंक गुलामगिरीला नेहमी ‘आजार’ म्हणत असे. “आम्हाला जायला हवे.” तो तिच्या पायाशी बसला.

हा दिवस कधीतरी येणार आहे हे तिला माहीतच होते, असे तिच्या नजरेत दिसत होते.

माझा श्वास अडखळू लागला. छाती जड झाली. माझे हात घामेजले होते आणि पोटात ढवळू लागले होते. आता पिंकला सांगितलेच पाहिजे हे माझ्या लक्षात आले होते. पण ते कसे सांगावे हेच कळत नव्हते.







त्या रात्री मला झोप आली नाही.

“काय झालं बाळ?” मो मो बे ने मला आपल्या खुर्चीवरूनच विचारले.

“मला परत जायचं नाही,” मी एकदम उत्तर दिले.

“होय बाळ, मला माहित आहे,” ती म्हणाली, “तुला परत जायचं नाही आहे ते.”

“तुला माहित नाही. मी सैन्यात होतो, पण मी माझ्या तुकडीतून पळून आलो आहे. मी पळून जात असतानाच मला गोळी लागली.” मी हुंदके देऊन इतका रडू लागलो की माझ्या छातीत दुखू लागले. “मी भित्रा आणि पळपुटा आहे.”

ती बराच वेळ शेकोटीकडे पाहत राहिली आणि खूप वेळ काहीच बोलली नाही. मग माझ्या रडण्याहून मोठ्या आवाजात ती म्हणाली, “तू असा काहीही नाही आहेस. तू फक्त एक लहान मुलगा आहेस... केवळ एक लहान मुलगा! तुला भीती वाटते ते साहजिकच आहे. भीती वाटत नाही असे कोणीच नसते.”

“मी पिंक सारखा शूर नाही... माझ्यात धैर्य नाही.”

“हे बघ बाळ, भीती वाटते म्हणजे तू शूर नाहीस असे नाही, हे तुला माहित नाही का?”

“पण मला मरायचं नाही.”

“हे बघ, मरणापेक्षाही वाईट गोष्टी असतात. पण तुला भीती वाटावी असे काहीच नाही. आता तू इथे माझ्याजवळ आहेस, माझ्या कवेत आहेस. तू एक दिवस चांगला म्हातारा होणार आहेस. जेव्हा तुझी वेळ येईल, तेव्हा परमेश्वर तुझा आत्मा स्वर्गात घेऊन जायला एक छान गाणारा पक्षी पाठवेल. आता बघ, तुला गाणाऱ्या पक्षाची तर भीती वाटत नाही ना?”

तिचे हे शब्द ऐकून मला छान झोप लागली. स्वप्नात मला गाणारे पक्षी, सुंदर हिरवळ, स्वच्छ सूर्यप्रकाश आणि रंगीबेरंगी फुले दिसली.



दुसऱ्या दिवशी सकाळी आम्ही जाण्याची तयारी केली. आम्ही मक्याचा ब्रेड, खारवलेले पोर्क आणि वाळवलेल्या शेंगा बांधून घेतल्या. खरे तर तिथेच राहण्यासाठी मी काय हवे ते केले असते, पण पिंकबरोबर जाणेच योग्य होते. त्याच्यासाठी मला एवढे तरी करायलाच हवे होते.

आम्ही आमच्या तयारीवर एकदा शेवटचा हात फिरवत असताना आणि आम्ही तिथे राहिलो असल्याच्या काही खुणा मागे राहिल्या नाहीत ना याची खात्री करून घेत असताना आम्हाला रानातून जोरजोरात ओरडण्याचा आणि किंचाळण्याचा आवाज ऐकू आला.

“लुटारू!” पिंक म्हणाला आणि एक लाकडाचा ढलपा त्याने मारण्यासाठी हातात घेतला.

मो मो बे ने तो त्याच्याकडून काढून घेतला. “आधी तळघरात जा. एका म्हाताऱ्या काळ्या बाईला ते काही करणार नाहीत. तुम्ही आधी तळघरात पळा. मी काय सांगते ऐकलंत ना?”

आम्हाला काही ते आवडलं नाही, पण तिने आम्हाला ढकलले. “जा लवकर, ते इथे येण्यापूर्वी पळा आधी.” तिने तळघराचे दार उघडले आणि आम्हाला ढकलूनच दिले. “मी सांगेपर्यंत बाहेर येऊ नका.”

ती खोलीबाहेर गेली तसा व्हरांड्यातील पायऱ्यांचा किरकिरणारा आवाज ऐकू आला.

“ती त्यांना हाकलून लावते आहे,” पिंक हळूच कुजबुजला.

लुटारू आत आले तेव्हा माझं काळीज इतकं धडधडत होतं की लुटारूंना ते ऐकू येत असणार याची मला खात्रीच वाटत होती. खायला काही मिळतंय का हे पाहण्यासाठी ते सगळं सामान धुंडाळत होते त्याचा मोठा आवाज येत होता. मग सर्व शांत झाले. बाहेरच्या झाडांमधून गोळी झाडल्याचा एकच आवाज आला. एक मोठी आरोळी ठोकून ते निघून गेले.

मो मो बे आम्हाला बोलावण्याची आम्ही वाट पाहत होतो, पण तिने बोलावले नाही. अखेर आम्ही वर येऊन बाहेर पळालो आणि आम्हाला मो मो बे व्हरांड्याबाहेर पडलेली दिसली.



“आम्ही इथे राहिलो, म्हणून तू त्यांच्या तावडीत सापडलीस,” पिंक तिला उचलून घेत रडत रडत म्हणाला.

तिचे डोळे दूरवर कुठेतरी पाहत होते, ते त्याने अलगद मिटले.

“तुझ्या मुलाचं तुझ्यावर खूप प्रेम आहे, मो मो बे. खरंच त्याचं खूप प्रेम आहे.” तिला मिठीत घेत तो हुंदके देत म्हणत होता.

तिचा हात थंड पडेपर्यंत आम्ही दोघांनी तो धरून ठेवला होता.





विलोच्या झाडाखाली आम्ही तिला दफन केलं आणि मग तिथून निघालो. संघराज्याच्या सैन्यापर्यंत पोहोचायला आम्हाला तीन दिवस लागतील असा पिंकचा अंदाज होता. तो सूर्याची गती न्याहाळत होता.

तिचे शब्द अजून माझ्या कानात घुमत होते. मी शूर असल्याचं ती म्हणाली होती ते शब्द. युद्ध सुरु झाल्यापासून कधी नव्हे इतकी माझी चाल आता स्थिर होती. गावाकडे फिरायला जावं तशा मोकळ्या मैदानातून आम्ही चालत होतो, म्हणजे, दुसऱ्या दिवशीच्या सकाळपर्यंत. नंतर कोणीतरी आमचा पाठलाग करत असल्याचे आम्हाला जाणवू लागले.

“हे ठेव,” पिंकने त्याचा चष्मा खिशातून काढून माझ्याकडे दिला. “त्यांना जर माझ्याकडे चष्मा मिळाला, तर फारच गडबड होईल.”

त्यांनी आम्हाला गाठलं तेव्हा एकजण ओरडला, “ए पोरा, या काळ्याबरोबर तू कुठे निघाला आहेस?”

माझी उत्तरेकडची बोलण्याची ढब त्यांना कळेल म्हणून मला उत्तर द्यायचं नव्हतं. त्याने आमचं बिंग फुटलं असतं.

“ए पोरा, तू कुठल्या तुकडीतील आहेस?” त्यांचा म्होरक्या खेकसला.

माझ्याकडे उत्तर नव्हतं.

“तू संघराज्यातला का?” एकाने माझ्या पाठीवरच्या बॅगेतील गणवेश ओढून काढला आणि डिवचून म्हणाला.

“

नाही... मी त्यातला नाही. एकजण मेला होता, त्याचा गणवेश मी घेतला,” त्यांना खरं वाटावं म्हणून मी अडखळत म्हणालो.

तेव्हाच त्यांनी आम्हा दोघांना पकडले. माझ्या शब्दाने त्यांची खात्री पटली होती.

आता आम्ही कॉन्फेडरेटच्या सैन्याचे बंदी होतो. त्या रात्री आम्हाला एका कोठारात ठेवले होते. पिंक तापाने थरथरत होता. त्याने मला जसे धरून ठेवले होते तसेच आता मी त्याला धरून ठेवले.





दुसऱ्या दिवशी सकाळी आम्हाला एका बंद गाडीत टाकलं. वाटेत अनेक वेळा थांबत आमचा प्रवास बहुधा दोन दिवस चालला होता. दाराच्या फटीतून येणाऱ्या उजेडाने आमचे डोळे दिपत होते. मग आम्हाला एका घोडागाडीत टाकून एका शहरातून नेण्यात आलं.

शहरातले लोक आमच्याकडे टक लावून पाहत होते. त्यांच्या नजरेत तुच्छता आणि द्वेष होता. अचानक आम्ही एका तुरुंगाच्या दरवाज्याशी थांबलो.

“त्याच्यावर ‘अँडरसनव्हिल’ असं लिहिलंय,” पिंक हळूच कुजबुजला.

माझ्या काळजाचा ठोका चुकला. मी याबद्दल ऐकलं होतं. कॉन्फेडरेटच्या सर्वात वाईट छावण्यांपैकी ती एक होती.



आम्हाला गाडीतून खाली ढकललं तेव्हा आम्ही दोघे जमिनीवर आपटलो.

“नको, नको,” आम्हा दोघाना फरफटत नेत असताना मी विनवणी करत होतो.

अंगात ताप असल्याने पिंक अडखळून खाली पडला. तरीही त्यांनी त्याला निष्ठुरपणे फरफटत नेले. आम्हा दोघांना निरनिराळ्या दिशांना जायला भाग पाडेपर्यंत त्याने काही विरोध केला नव्हता.

मग माझ्याकडे येत तो म्हणाला, “से, ज्या हाताने लिंकनच्या हाताला स्पर्श केला आहे, त्या हाताला मला एकदा अखेरचा स्पर्श करू दे.”





त्याचे डोळे भरून आलेले मला दिसत होते आणि आम्हा दोघांना ओढून वेगळे करेपर्यंत त्याने माझा हात घट्ट धरून ठेवला होता. एक दणका देऊन त्यांनी त्याला फरफटत दूर नेले. मागे वळून पाहत तो मला काहीतरी सांगायचा प्रयत्न करत होता, पण त्याच्या पाठीवर चाबकाचे फटकारे मारत ते त्याला ढकलून घेऊन गेले.



ही गोष्ट खरी आहे कारण, शेल्डन रसेल कर्टिस ने ती त्याची मुलगी रोझा हिला सांगितली.

रोझा कर्टिस स्टोवेल ने ती तिची मुलगी एस्टेला हिला सांगितली.

एस्टेला स्टोवेल बार्बर हिने ती नंतर तिचा मुलगा विल्यम याला सांगितली.

ती त्यांनी नंतर त्यांची मुलगी पॅट्रिशिया हिला, म्हणजे मला, सांगितली.

माझ्या वडिलांनी जेव्हा ही गोष्ट संपवली तेव्हा आपला हात पुढे करून ते म्हणाले, "अब्राहम लिंकनच्या हाताशी हस्तांदोलन केलेल्या हाताला ज्याने स्पर्श केला आहे, त्या हाताला स्पर्श केलेला हाच तो हात आहे."





पिंकस आयलीचे आता कोणीही वारस हयात नसल्याने हे पुस्तक हीच त्याची एक लिखित आठवण आहे.

तुम्ही जेव्हा हे पुस्तक वाचाल, तेव्हा ते खाली ठेवण्यापूर्वी त्याचे नाव मोठ्याने म्हणा आणि त्याला कधीच विसरणार नाही अशी शपथ घ्या.



